महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/महाडीबीटी/२०२१/४५४२ दिनांक : 12 OCT 2021

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका/पदवी/पदवित्तर पदवी संस्था
पुणे विभाग, पुणे.

**विषय- डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत निधी वितरीत करणेबाबत.**

संदर्भ- १.शासन पत्र क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.०२/तांशि-४,दि.०८.०१.२०२१
२. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२०-२१/१९,दि.१४.०१.२०२१
३. शासन पत्र क्र.तंनिवि-१५२१/प्र.क्र.१०७/२१/तांशि-३,दि.२८.०६.२०२१
४.संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/२२५,दि.१३.०७.२०२१
५. शासन पत्र क्र.तंनिवि-१५२१/प्र.क्र.१०७/२१तांशि-३,दि.०९.०९.२०२१
६. संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१/२२५,दि.१३.०७.२०२१

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेच्या डीबीटी पोर्टलद्वारे अर्जाची छाननी करताना संदर्भ क्र.१ च्या शासन पत्रातील सर्व मुद्दयाचे पालन करण्याबाबत संदर्भ क्र.०२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते तसेच त्यात अर्ज छाननीबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या या कार्यालयाने मंजूर केलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जानूसार संचालनालय स्तरावरून निधी मंजूरीसाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला.

संदर्भ क्र.०३ अन्वये विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करताना संदर्भ क्र.०१ च्या शासन पत्रातील सुचना व अटी व शर्तींचे पालन करण्यात आले आहे काय असा मुद्दा उपस्थित करण्यात आल्याने संदर्भ क्र.०३ च्या शासन पत्रानुसार उपस्थिती करण्यात आलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ अन्वये विभागीय कार्यालयांनी पाठविलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे पुन्हा शासनास योजनेचा निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला.

संदर्भ क्र.०५ च्या पत्रांन्वये शासन स्तरावर पुन्हा याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला असून सन २०२०-२१ मध्ये कोविड-१९ या साथिच्या रोगाच्या अनुषंगाने राज्यात लागू असलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत खरोखरच वसतीगृहाचा वापर झालेला आहे काय, याची खात्री करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

**डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत आपल्या महाविद्यालयातील किती विद्यार्थी वसतिगृहात व किती विद्यार्थी खाजगी खोल्यांमध्ये राहत होते याची शहानिशा करुन अचूक माहिती खालील नमूद Excel Sheet मध्ये सादर करावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी सदर योजनेसाठी महाडीबीटी पार्टेलद्वारे अर्ज सादर केले आहेत त्यापैकी ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज रद्द करायचे आहेत त्यांची यादी या विभागीय कार्यालयास दि.१७.१०.२०२१ पर्यंत हस्तदेय व Excel Sheet मध्ये सादर करावी.**

सदर माहिती न चुकता या कार्यालयास सादर करावी जेणेकरून कोणतीही वित्तीय अनियमीतता होणार नाही अन्यथा सदर अनियमिततेस सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

**वस्तीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती.**

| अ.क्र | अर्ज क्रमांक | वस्तीगृहात राहण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची नावे. | वस्तीगृहात राहिला किंवा कसे? | राहीला असल्यास किती कालावधीसाठी राहीला. |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**खाजगी खोल्यांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती.**

| अ.क्र | अर्ज क्रमांक | खाजगी खोल्यांमध्ये राहीलेल्या विद्यार्थ्यांची नावे | राहीला असल्यास किती कालावधीसाठी राहीला. |
|---|---|---|---|
| | | | |

(डॉ. दत्तात्रय जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे